# लिंगभाव न्याय : आव्हाने आणि उपाय

**प्रा. डॉ. दिलीप आर. चव्हाण**
*समाजशास्त्र विभाग, ज. जि. म. वि. प्र. सह समाजाहे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव*

## सारांश

*प्राचीन काळापासून ते समकालीन भारतीय समाजात लिंगभाव विषमतेचा प्रत्यय येतो. ही विषमता स्त्रियांच्या दृष्टीने अत्याधिक हानिकारक ठरते. स्त्रीचा एकूणच सामाजिक दर्जा आणि तीचे अधिकार यांचे हनन केवळ एवढ्यापुरतीच ती कारणीभूत ठरत नाही तर स्त्रीच्या अस्तित्वाच्या दृष्टीने देखील ही विषमता प्रतिगामी ठरते. गामिन- नगरी, प्रगत- अप्रगत, आदिम- आधुनिक अशा विविध समूहांमध्ये लिंगभाव न्यायाचा प्रश्न आढळतो. शासन प्रणालीत कार्यरत सत्ताकारणातील लोकप्रतिनिधी, समाजकार्य करणारे समाजधुरीण आणि समाज सुधारक अशा सर्वांच्याच दृष्टीने लिंगभाव न्याय हा चिंतेचा विषय ठरलेला आहे. भारतासह जगातील जवळजवळ सर्वच राष्ट्रांमध्ये महिलांना मिळणारी वागणूक ही समतापूर्वक नसल्याचेच जाणवते व त्यातूनच लिंगभाव न्यायाचा मोठा प्रश्न निर्माण होतो. त्याचे निराकरण करण्यासाठी शासकीय, अशासकीय, स्वयंसेवी संस्थात्मक पातळीवरील प्रयत्नांबरोबरच धार्मिक, सांस्कृतिक, कौटुंबिक व वैयक्तिक स्तरावरील प्रयत्नांची देखील आवश्यकता आहे.*

***परिभाषिक शब्द*** *:- लिंगभाव, न्याय, लिंगभाव व न्याय, समता, विषमता, नैतिक मूल्य, सामाजिक न्याय.*

## प्रस्तावना

'लिंगभाव' ही समाजोदभवित प्रवृत्ती आहे. तिची निर्मिती पुरुष वर्चस्ववादी भावनेतून झालेली आहे. समाजाच्या सर्वच अंगांवर आपले प्रभुत्व असावे किंबहुना तो केवळ आपलाच अधिकार आहे, अशा आत्मकेंद्रित स्वरूपाच्या स्व-प्रतिष्ठेच्या कल्पनांमधून 'लिंगभाव' ही लिंगाच्या आधारे सामाजिक विषमतेची प्रोत्साहन देणारी संकल्पना निर्माण झालेली आहे. जगाच्या पाठीवरील सर्व देशांमधील समाजात लिंगभाव आढळून येतो. लिंगाच्या आधारे संधी नाकारणे, व्यक्ती म्हणून आपल्या प्रमाणेच मान्यता न देणे, अधिकारांचे हनन करणे, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, कौटुंबिक इत्यादी विविध क्षेत्रांमध्ये एखादी व्यक्ती केवळ पुरुष नसून 'स्त्री' आहे या एकमेव कारणाने तिचे खच्चीकरण केले जाते. या सर्वच क्षेत्रांमध्ये महिलांचे स्थान किती नगण्य आहे, हे आजपर्यंत झालेल्या अनेक अभ्यासामधून प्रकर्षाने समोर आलेले आहे.

'Towards Equality' ह्या १९७५ साली भारत सरकारने प्रकाशित केलेल्या अहवालात डॉ.बीना मुजुमदार, लोतिका सरकार, पद्मा शेठ इ. अभ्यासकांनी विविध संशोधने आणि आकडेवारीच्या आधारे अत्यंत ठळकपणे दाखवून दिले आहे. त्याचप्रमाणे शासकीय धोरणे, उपलब्ध निधी, धोरणात्मक तरतुदी, मनुष्यबळ आणि न्यायदानाच्या बाबतीतील त्रुटी यांच्याविषयी देखील प्रखर विश्लेषण केले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर व स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या चतु:सूत्रीचा अवलंब करणारे संविधान अंगीकृत केल्यानंतर देखील भारतीय स्त्री'ला लिंगभाव निर्मित विषमतेला सामोरे जावे लागते, हे सामाजिक वास्तव हा अहवाल दर्शवितो. १९७५ ते २०२२ या ४७ वर्षांच्या कालखंडात भारतीय समाज अनेक स्थित्यंतरांमधून गेलेला आहे. वैज्ञानिक, तांत्रिक, संगणक, माहिती व तंत्रज्ञान या क्षेत्रातील विलक्षण वेगाने झालेली प्रगती, जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण यासारख्या प्रक्रियांमुळे संपूर्ण जागतिक समाज ढवळून निघाला. लिंगभावात्मक परिस्थितीमध्ये काही अंशी परिवर्तन झाले असले तरी आजही महिला सामाजिक न्यायापासून वंचित आहेत. हे जळजळीत वास्तव आहे. १९७५ - Towards Equlity, २०२२ – 'बेटी बचाओ - बेटी पढाओ' ही वाटचाल पहिली म्हणजे भारतीय स्त्री-जीवनाचे वर्तमान वास्तव प्रखरपणे समोर येते व लिंगभाव न्यायाची समकालीन भारतीय समाजातील आवश्यकता ठळकपणे जाणवते.

## उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधन पेपरच्या अनुषंगाने पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१) मनुस्मृतीत सांगितल्याप्रमाणे 'न स्त्री स्वातंत्र्य महर्ती' याप्रमाणे असलेली तत्कालीन परिस्थिती समजून घेणे.
२) भारतीय समाजातील लिंगभाव न्याय संकल्पना समजावून घेणे.
३) भारतीय समाजात लिंगभाव न्याय प्रस्थापित न होण्यामागील कारणे अभ्यासणे.

**संशोधनाचे गृहितके**

१) भारतीय समाजात आजही लिंगभाव विषमता आढळून येते.
२) सर्वच क्षेत्रातील पुरुषी वर्चस्व स्त्रियांना सामाजिक समतेपासून दूर करते.
३) लिंगानुसार स्त्री-पुरुषांचा सामाजिक दर्जा निश्चित केला जातो.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोध निबंध लेखनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अभ्यास पद्धतींचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला असून विविध विचारवंतांनी आपापल्या ग्रंथात व्यक्त केलेल्या विचारांचा आधार घेतलेला आहे. याशिवाय वर्तमानपत्रे, नियतकालिके व इंटरनेटवर उपलब्ध असणाऱ्या माहितीचा आधार घेतलेला आहे.

लिंगभाव न्यायाची संकल्पना स्पष्ट करण्यासाठी प्रथमतः 'न्याय' ही संकल्पना समजून घेणे आवश्यक ठरते. न्याय या शब्दासाठी Justice हा इंग्रजी पर्यायवाची शब्द आहे. जो लॅटिन शब्द Jus पासून बनलेला आहे. Jus म्हणजे बंधन किंवा बांधणे किंवा जोडणे. अशाप्रकारे 'न्याय' ही संकल्पना सरळपणे व्यवस्थेशी संबंधित आहे. याचाच अर्थ असा की 'न्याय' हे अशा व्यवस्थेचे नाव आहे जी व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह, समूह-समूह यांना एका सूत्रात जोडते किंवा बांधते.

Justice is the name of those special moral values which are clearly related to human welfare. Such values are more important than all other rules & guidelines of life. – J. S. Mill
मानवी कल्याणाशी संबंधित सर्वश्रेष्ठ नैतिक मूल्ये म्हणजे न्याय, असे प्रतिपादन जे. एस. मिल करतात.
Justice means giving share to everyone. – Salmond.

'प्रत्येकास त्याचा हिस्सा देणे म्हणजे न्याय होय.' सालमंड यांनी केलेल्या न्यायाच्या ह्या व्याख्येत समाजातील प्रत्येक व्यक्तीस समान संधी देऊन विकासाच्या प्रक्रियेत भागीदार करून घेण्याचा आग्रह दिसतो. किंबहुना तो प्रत्येक व्यक्तीच्या नैसर्गिक असा जन्मजात अधिकार असतो, असा आशय सालमंड यांच्या व्याख्येतून प्रति ध्वनित होतो.

John Rolls यांनीदेखील न्याय संकल्पनेचे प्रतिपादन करताना 'न्याय' हा सर्वच सामाजिक संस्थांचा पहिला आणि अत्यावश्यक गुण आहे, असे म्हटले आहे. याचाच अर्थ सामाजिक संस्थांच्या अधिष्ठानात्मक बांधणीमध्ये न्याय तत्वाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. सामाजिक संस्था या समाजाचे अविभाज्य अंग आहे. धर्म, विवाह, कुटुंब, अर्थ, राज्य इ. कोणत्याही संस्थेत न्याय तत्त्वांशी विसंगतीपूर्ण व्यवस्था निर्माण झाल्यास त्याचे दूरगामी परिणाम संपूर्ण समाजावर होताना दिसतात. जसे भारतीय समाजात धर्म, विवाह, कुटुंब इत्यादी सामाजिक संस्थांमध्ये स्त्रिया आणि निम्न वर्णातील लोकांना अधिकार नाकारल्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेस लिंगभावात्मक तसेच जातीय व वर्णीय पातळीवर विषमतेचा, भेदभावाचा दाहक प्रत्यय आलेला आहे. परिणामी आज देखील स्त्री शूद्रादिशूद्रांची अवस्था मागास आहे. समाजमन त्यामुळे अस्वस्थतेने धुमसत असल्याचे कित्येक आंदोलने, चळवळी, दंगली यासारख्या घटनांच्याद्वारे दृष्टोत्पत्तीस पडते.

उपरोक्त सर्वच न्यायविषयक विचारतत्त्वांचा आशय लक्षात घेता समानता संधींची आणि विकासाची समानता, व्यक्तीच्या व्यक्तिगत तसेच सामाजिक अधिकारांची प्रतिष्ठा अबाधित ठेवणे इ. लक्षणे दृग्गोचर होतात. ज्या समाजात नैसर्गिक न्यायतत्वांची अवहेलना केली जाते. त्या समाजात हिंसा, अस्थैर्य, विकासाची गती मंदावणे इ. नकारात्मक वा विचलनात्मक बाबी वाढीस लागतात. 'लिंगभाव आणि हिंसाचार : स्त्री चळवळीपुढील आव्हाने' या

आपल्या निबंधात सई ठाकूर प्रतिपादन करतात की, कोणत्याही समाजव्यवस्थेत जिथे उच्च-नीच्चतेची उतरंड आहे. त्या समाजव्यवस्थेचा हिंसा हा एक अविभाज्य भाग असतो. मानवी सामर्थ्य आणि सामाजिकता यांच्या विकासासाठी माणसामाणसामधील समता ही एक नैसर्गिक आवश्यकता आहे. त्यामुळे समाज व्यवस्थेतील विषमता ही एक अनैसर्गिक विकृती आहे. तेव्हा हे स्पष्टच आहे की, विषमता ही लादलेली असते. अशा व्यवस्थेत कनिष्ठ समजला जाणारा समाजगट नेहमीच सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठेच्या बाबतीत वंचित राहतो.

ही वंचना, नामुष्की किंवा निम्नता हा समाजगट सहजासहजी स्वीकारत नाही. दुसरीकडे त्यांच्या अस्तित्वावर हल्ला करण्याचा आपला जन्मजात अधिकार आहे. असे विषमता लादणाऱ्या गटाला म्हणजेच स्त्री-समूहाच्या बाबतीत पुरुष समूहास वाटते. अशा परिस्थितीत स्त्री-समूह अनेक वंचना आणि अत्याचाराचा बळी ठरतो. लिंगभाव असमानता वाढीस लागते आणि यातूनच लिंगभाव समता प्रस्थापित करण्यासाठी लिंगभाव न्यायाची आवश्यकता प्रकर्षाने जाणवते. लिंगभाव विषमतामूलक व्यवस्थेच्या निर्मूलनासाठी 'लिंगभाव न्याय' अस्तित्वात आणणे, जोपासणे, संवर्धन करणे गरजेचे ठरते.

**लिंगभाव न्याय**

'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या मनुस्मृति वचनानुसार स्मृती काळापासूनच लिंगभेदाधारित विचारसरणी भारतीय समाजमानसात रुजलेली होती हे स्पष्ट होते. वेदपूर्वकालीन अनार्य संस्कृतीत महिलांचे सामाजिक स्थान किमान पुरुषांच्या बरोबरीचे होते, असे दिसते. तथापी, स्मृतीकालीन विचार स्त्रियांच्या नैसर्गिक व नैतिक न्यायतत्वाच्या विरोधात होते हे स्त्रियांवर लादलेल्या अनेक निर्बंधांमुळे ठळकपणे अधोरेखित होते. तेव्हापासून ते अगदी आजपावेतो जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये लिंगाधारित अन्यायाचा सामना स्त्रियांना करावा लागत आहे.

वस्तुतः स्त्री आणि पुरुष हे दोन्हीही मानवी समाजाचे अविभाज्य घटक आहेत. समाज विकासाच्या अविरत वाटचालीमध्ये दोघांचेही योगदान आणि महत्त्व अनन्यसाधारण आहे व्यक्ती म्हणून दोघांचेही सामाजिक स्थान व तदनुषंगाने प्राप्त होणारे अधिकार आणि सोयी-सवलती यांच्यामध्ये समानता असणे अपेक्षित आहे. परंतु भारतीय समाजावरील पारंपारिक धर्म वर्चस्ववादी विचारांमुळे स्त्रियांना त्या केवळ स्त्रिया आहेत म्हणून न्याय नाकारला जातो. समताधिष्ठित समाजाचे लाभ नाकारले जातात. कौटुंबिक, सांस्कृतिक, लैंगिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय अत्याचारांचा सामना करावा लागतो. अशा विविध क्षेत्रांमध्ये जाणीवपूर्वक दुय्यमत्त्व दिले जाते. ते स्वीकारणे हा स्त्रीचा धर्म मानला जातो व असा स्वीकार करणारी स्त्री सुसंस्कृत मानली जाते. अशा स्त्रियांची पूजा करण्याचे निर्देशन आढळते. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:' असे प्रतिपादन मनुस्मृतीत आढळते. परंतु हे पूजन एक प्रकारचे कोंदनच आहे. जे स्त्रियांवरील बंधनांना पूरक आणि पोषक असेच आहे. स्त्री स्वातंत्र्याचे दमन करणारे, लिंगभावात्मक न्यायतत्वाचे दमन करणारे असे आहे. असे विचार विषमतामूलक व लिंगभाव अन्यायास पुष्टीकारक असे आहेत. भारतीय समाजात लिंगभाव न्याय प्रस्थापित न होण्यामागे असलेल्या कारणांचा उहापोह पुढील मुद्द्यांच्या आधारे करता येईल.

**लिंगभाव न्याय प्रस्थापनातील आव्हाने**

भारतीय समाजात लिंगभाव न्याय प्रस्थापित करून स्त्री-पुरुष समानतेचे उद्दिष्ट गाठण्याच्या मार्गात पुढील अडथळे कारणीभूत ठरतात.

**१) लिंगभेदाचा दृष्टिकोन** :- पुरूषसत्ताक समाजातील लोकांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन मूलतः पूर्वग्रहबाधित असाच आहे. स्त्री कमजोर आहे. बौद्धिक व शारीरिक स्तरावरती पुरुषांची बरोबरी करू शकत नाही. पुरुषाच्या दृष्टीने उपभोग्य वस्तू, मादी, गृहकार्य करणारी अशा दृष्टिकोनातून पाहिले जाते. लहानपणापासूनच मुलींची खेळणी, मुलांची खेळणी असा फरक करून स्त्रियांच्या भूमिकांचे मर्यादित क्षेत्रात निर्धारण केले जाते व एक प्रकारे तिला लिंगभाव न्याय नाकारण्यात येतो.

**२) धार्मिक पुरुषी वर्चस्व** :- विविध धार्मिक विधी, संस्कार, कुलाचार, कुलधर्म यांच्यामध्ये स्त्रियांवर अनेक बंधने लादण्यात आलेली आहेत. ही बंधने विविध धर्मांमध्ये आढळतात. धार्मिक पुरुषी वर्चस्वामुळे स्त्रियांची कुचंबणा तर होतेच परंतु त्याचबरोबर पुरुषी अपत्यप्राप्तीचा आग्रहदेखील केला जातो.

**३) कौटुंबिक दुय्यमत्व** :- केवळ चूल आणि मूल एवढेच मर्यादित असे कार्यक्षेत्र स्त्रीसाठी आखून दिल्याने कौटुंबिक पातळीवरील लिंगभाव न्याय स्त्रीसाठी दुरापास्त झाल्याचे चित्र आहे. आज काही प्रमाणात हे चित्र बदलले असले तरी ग्रामीण, आदिवासी व पारंपारिक समाजात मात्र हेच चित्र पहावयास मिळते.

**४) राजकीय स्वयंप्रेरणेचा अभाव** :- राजकीय क्षेत्रात अनेक स्त्रिया सहभागी होताना सध्या दिसून येतात. परंतु त्यांचे राजकीय क्षेत्रातील आगमन स्वयंप्रेरणेने झालेली नसते. पतीच्या इच्छेखातर किंवा महिला आरक्षणामुळे त्या राजकिय क्षेत्रात येतात. परिणामी त्यांची प्रतिमा केवळ 'रबरी शिक्का' अशी होते. स्वयंनिर्णय आणि स्वयंप्रेरणेचा अभाव जाणवतो. पतिच्या राजकीय भूमिकेनुरूप आपली भूमिका अशा स्त्रिया ठरवतात. त्यामुळे लिंगभाव न्याय राजकीय क्षेत्रात देखील पुरेसा मिळत नाही.

राजकीय क्षेत्रात अगदी स्वातंत्र्यलढ्यापासून विविध आंदोलनांमध्ये स्त्रिया मोठ्या प्रमाणावर सहभागी झाल्यात. त्यांनी कित्येक आंदोलनांचे नेतृत्व केले. असे असले तरी अशा स्त्रियांची संख्या अत्यंत कमी आहे. शिवाय त्यांची बहुतांश शक्ती प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंड करण्यामध्ये आणि अशा प्रकारांपासून आंदोलनाचे संरक्षण करण्यामध्येच अधिक व्यतित होते असे चित्र आहे.

**५) आर्थिक पारतंत्र्य** :- आर्थिकदृष्ट्या स्त्रियांचे पुरुषावरील अवलंबित्व तिला लिंगभाव न्याय प्राप्त करण्यातील मोठा अडसर ठरतो. पूर्वीच्या काळी स्त्री आर्थिकदृष्ट्या पूर्णतः पतीवर अवलंबून होती. आज जरी स्त्रिया कमावित्या झाल्या तरी हे प्रमाण पुरुषांपेक्षा अत्यल्प व नगण्य असेच आहे. स्त्रियांनी प्राप्त केलेल्या संपत्तीवर देखील पुरुषांचा अधिकार मोठ्या प्रमाणात दिसून येतो. आपल्या मर्जीनुसार स्त्री स्वतःच्या प्राप्त संपत्तीचा विनियोग करू शकत नाही, ही बाब लिंगभाव न्यायाच्या दृष्टीने प्रतिगामी ठरते.

वरील प्रमुख क्षेत्रांबरोबरच शिक्षण, रोजगार, मनोरंजन, पर्यटन, जाहिरात, संरक्षण इत्यादी विविध क्षेत्रांमध्ये स्त्रीला प्राप्त झालेले दुय्यमत्व तिच्यासाठी लिंगभाव न्यायाची प्राप्ती दूर ठेवते. सर्वच क्षेत्रातील पुरुषी वर्चस्व स्त्रियांना सामाजिक समतेपासून दूर सारते. पुरुषानुकूल व्यवहार प्रणालीचा स्वीकार करावयास बाध्य करते.

**लिंगभाव न्याय प्रस्थापन : उपाययोजना**

"ज्या परमेश्वराने ही आश्चर्यकारक सृष्टी उत्पन्न केली. त्यानेच स्त्री-पुरुष निर्माण केले. तरी सर्व प्रकारचे साहस, दुर्गुण स्त्रियांच्याच अंगी वसतात किंवा जे अवगुन स्त्रियांचे अंगी आहेत तेच पुरुषात आहेत किंवा नाहीत हे अगदी स्पष्ट करून दाखवावे याच हेतूने हा लहानसा निबंध मी माझ्या सर्व देश भगिनींचा अभिमान धरून रचला आहे." (स्त्री-पुरुष तुलना, ताराबाई शिंदे, १८८३)

'स्त्री-पुरुष तुलना' ह्या आपल्या निबंधाच्या प्रस्तावनेत ताराबाई शिंदे यांनी वरील उद्देश कथन केला आहे. लिंगभाव समतेचे तत्त्व प्रस्थापित करण्यासाठी स्त्री-पुरुषांतील समान सामायिक गुणावगुणांचे वर्णन करतानाच लिंगभाव न्यायाची मागणी त्या करतात.

खरेतर, लिंगभाव न्याय हा मानवी हक्क आहे. प्रत्येक स्त्रीला भयमुक्त वातावरणात संपूर्ण स्वातंत्र्य आणि सन्मानपूर्वक जगण्याचा अधिकार आहे. केवळ स्त्रियांच्याच नव्हे तर संपूर्ण समाजाच्या विकासासाठी लिंगभाव न्याय अपेक्षितच नव्हे तर अपरिहार्य आहे. या दृष्टीने कौटुंबिक स्तरापासून ते व्यापक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्री-पुरुषांमध्ये लिंगभाव न्याय प्रस्थापित झाला पाहिजे. त्या दृष्टीने पुढील काही उपायांचा परामर्श घेता येईल.

**१) कुटुंबांतर्गत परिवर्तन** :- स्त्रीयांविषयीच्या विचारांमध्ये किंवा मानसिकतेमध्ये कौटुंबिक स्तरावर परिवर्तन होणे अत्यावश्यक आहे. मुलगा-मुलगी असा भेदभाव न करता त्यांना भूमिकांचे शिक्षण दिले पाहिजे. उपयुक्त शैक्षणिक वा पूरक सुविधा समानपणे उपलब्ध केल्या पाहिजे. कुटुंब ही सामाजिकरणाची आद्य पाठशाळा आहे, यादृष्टीने

लिंगभाव न्यायाच्या दृष्टीने कौटुंबिक स्तरावरील हे परिवर्तन अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. कारण यातूनच भावी पिढ्यांपर्यंत ही विचारधारा प्रवाहीत होत असते.

**२) धार्मिक बाबीमधील परिवर्तन :-** भारतीय समाज हा धर्मभोळा समाज आहे. भारतीय लोक समूहावर धर्माचा फार मोठा प्रभाव आहे. त्यामुळे धार्मिकदृष्ट्या महत्त्वाच्या व धार्मिक नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीनी लिंगभाव न्यायाचा पुरस्कार करून धार्मिक रीतिरिवाजांमध्ये कालसुसंगत असे परिवर्तन केले पाहिजे. कर्मठ आणि भेदभावास पोषक व अन्यायकारक रूढीना तिलांजली दिली पाहिजे. धार्मिक तत्त्वांचा अंगीकार समाजात जलदगतीने आणि मनापासून केला जातो. याचा फायदा यासंदर्भात घेता येईल.

आज काही प्रमाणात शहरी क्षेत्रांमध्ये कुलधर्म, कुलाचार, तर्पण, श्राद्ध, अंत्यसंस्कार इ.मध्ये मुलींना स्थान दिलेले दिसते. परंतु ती एक प्रकारची विवशता असते. मुलगा नसल्याने असे प्रकार होतात. मात्र त्यांना संपूर्ण समाजाचे सर्रास मान्यता नसते. या मनोवृत्तीमध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन होणे अपेक्षित आहे. उदा. शबरीमाला, शनिदेव दर्शन.

**३) शिक्षणाचा प्रसार :-** महिलांच्या उत्थानाचा कार्यक्रम म. फुले यांनी स्त्री-शिक्षणापासूनच आरंभ केला. आपल्यावरील अन्यायाची जाणीव शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रियांना झाली. इतकेच नव्हे तर स्त्रीदास्यविमोचन कार्य ज्या समाजसुधारकांनी आरंभिले त्यांची प्रेरणा देखील पाश्चात्त्य शिक्षण हेच ठरले.

आधुनिक काळात शिक्षण प्रसाराची माध्यमे आणि साधने यांच्यात वाढ झालेली असली तरी लिंगभाव न्यायाच्या दृष्टीने संवेदनशीलता जागृत करणारे असावे. केवळ भौतिक संपन्नतेस प्राधान्य देणारे नसावे तर स्त्रियांमध्ये आत्मभान जागृत करणारे असावे.

शैक्षणिक संस्थांमध्ये Good Touch, Bad Touch व स्वसंरक्षणार्थ कराटे प्रशिक्षण आज स्त्रियांना दिली जाते. या उपक्रमांतून लिंगभाव न्यायाची आत्यंतिक आवश्यकताच एक प्रकारे अधोरेखित होते.

**४) न्यायिक साक्षरता :-** लिंगभाव न्यायाच्या दृष्टीने स्त्रियांमध्ये न्यायिक किंवा विधिविषयक साक्षरता निर्माण होणे गरजेचे आहे. स्त्रियांवरील अन्यायाचा प्रतिकार करणारे, स्त्री हक्कांचे संरक्षण करणारे अनेक कायदे शासकीय स्तरावर तयार केले जातात. परंतु त्यांची माहिती गरजू स्त्रियांपर्यंत पोहोचत नाहीत. महिलांसाठी मोफत कायदेशीर सल्ला, न्यायालयीन कामकाजात मदत उपलब्ध असते. त्यांची माहिती विद्यार्थीदशेतच मुलींना देण्यात यावी.

**५) समाजसेवी संस्था :-** लिंगभाव न्यायाच्या प्रसारासाठी अनेक समाजसेवी संस्थांचे कार्य सध्या समाजात सुरू आहे. शासकीय आणि अशासकीय संघटना या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांची व्याप्ती अगदी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील आहे. Oxfam India, Oxfam International, Care India यासारख्या संस्था महिलांच्या हक्कांविषयी जाणीव जागृती निर्माण करतात. महिला व पुरुष यांच्यादरम्यान समानता साधणारी धोरणे आणि कार्यक्रमांमध्ये या संस्था आपले योगदान देतात. अशा प्रकारच्या समाजसेवी संस्थांना तळागाळापर्यंत आपले उपक्रम राबवण्यासाठी प्रोत्साहन मिळाले पाहिजे.

**निष्कर्ष**

- भारतासह जगभरात लिंगभाव न्यायाची उणीव जाणवते.
- लिंगभाव न्यायाच्या उणीवेमुळे स्त्री-पुरुषांमधील सामाजिक स्थान व दर्जाविषयक असंतुलन मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेले आहे.
- नैसर्गिक न्याय तत्वाचा अभाव लिंगभाव न्यायाच्या अभावामुळे महिलांच्या बाबतीत जाणवतो.
- विविध विकास विषयक संधी आणि सामाजिक अधिकारांपासून लिंगभाव न्यायाच्या अभावी महिला वंचित राहतात.
- लिंगभाव न्यायाच्या कमतरतेमुळे महिलांची सुरक्षितता देखील धोक्यात येते.

- शासकीय तसेच स्वयंसेवी संस्थांमार्फत महिलांविषयक लिंगभाव न्यायाची जाणीवजागृती प्रभावीपणे निर्माण करावयास हवी.
- लिंगभाव न्याय ही एक संवेदनशील जाणीव असून तिच्या निर्मितीच्या दृष्टीने धर्माचे आणि कुटुंबाचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे.

भारतीय समाजात लिंगभाव न्याय विकसित करण्याचे प्रयत्न म.फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजा राममोहन रॉय यासारख्या समाजसुधारकांनी आरंभिले. म.फुले यांनी या प्रश्नाकडे केवळ जाती प्रश्नाचा एक भाग म्हणून पाहिले नव्हते. त्यांची अत्यंत अचूकपणे स्त्री-पुरुष विषमतेच्या प्रश्नाचे स्वतंत्र अस्तित्व आणि गांभीर्य ओळखून ब्राह्मण स्त्रीयांची गणना देखील शूद्रादिकांमध्ये केली होती.

आज जागतिकीकरणाच्या माध्यमातून राष्ट्रां-राष्ट्रांतील अंतर कमी होताना दिसत असले तरी त्याचे स्वरूप निव्वळ आर्थिक आहे. स्त्री-पुरुषांचे रोजगार, शिक्षण विषयक विश्व निश्चितच बदलले आहे. परंतु हे परिवर्तन केवळ श्रीमंत आणि उच्च मध्यमवर्गा पुरते मर्यादित आहे.

समाजातील सर्वच स्तरातील घटकांपर्यंत लिंगभाव न्यायाची संकल्पना रुजली तरच खऱ्या अर्थाने स्त्रीयांच्या उन्नतीचा मार्ग प्रशस्त होईल.

## संदर्भसूची

शिंदे ताराबाई, १८८२, *स्त्री-पुरुष तुलना,* श्री शिवाजी छापखाना, पुणे (इंटरनेट आवृत्ती)

*महिला धोरण मसुदा २०१३,* महाराष्ट्र शासन, महिला व बालकल्याण विभाग

भागवत विद्युत, रेगे शर्मिला, २०००, *भारतातील समकालीन कळीचे प्रश्न : स्त्रीवादी चर्चा विश्वाचा आढावा,* स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे.

भागवत विद्युत, परदेशी प्रतिमा, १९९८, *अब्राम्हणी स्त्री-वादी इतिहास लेखनाच्या दिशेने,* स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे आणि क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी, पुणे – ७.

संपा.साबळे शर्मिला, २०१९, *भारतीय महिलांचा इतिहास,* दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

बोर्डे, खडसे सुनीता, *ऐतिहासिक परिक्षेत्रातील स्त्रिया,* शुभम अतकर प्रकाशन, पुणे

मोहंती सुमाता (अनु. पेंढारकर वैशाली), १९९९, *विकासाच्या प्रक्रियेतील स्त्री प्रश्न,* स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे आणि क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी, पुणे – ७.

ठाकूर रेखा, १९९८, *आदिमायेची मुक्ती,* स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे.

प्रा.डॉ.प्रदीप आगलावे, *भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या,* श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

Gender Equality, Wikipedia https://en.m.wikipedia.org/wiki

Gender Inequality, Wikipedia https://en.m.wikipedia.org/wiki

Justice for Women : High Level Group Report, https://www.unwoman.org>2020/03

Sociological Bulletin, Vol. 70, No. 1, Jan. 01 2021; SAGE Journal.